MHLA050001632020

**<u>लवाद प्रकरण नियमीत वसुली अर्ज क्र.२२५/२०२० मधील नि.क्र.२०</u>**
**<u>खालील आदेश.</u>**
**<u>[ श्रीराम सिटी युनियन फायनान्स लि. ..वि.. सुनिता व इतर ]</u>**

सदर कामी दरखास्तदार यांनी नि.क्र.२० लगत अर्ज देवून नमुद केले की, सामनेवाला क्र.१ हे जाणीपुर्वक थकित रक्कम जमा करीत नसल्याने त्यांच्याविरुध्द दि.प्र.सं.क्रम २१ नियम ५४ अन्वये मिळकत जप्तीचा आदेश झाला आहे. सदर मिळकती लिलाव होऊन त्यातून दरखास्तीतील रक्कम मिळावी अशी विनंती अर्जदाराने केलेली आहे. सदरकामी सामनेवाला क्र.१ ते ३ यांना नोटीसची बजावणी होऊन ते प्रकरणामध्ये नि.क्र.९ लगत हजर झाले. या दरखास्तीवर लेखी म्हणणे देण्याची मुदत त्यांना देण्यात आली होती. मात्र त्यांनी म्हणणे दिले नाही. सामनेवाला क्र.३ विरुध्द सदर दरखास्त रद्द झाली आहे. दि.प्र.सं.क्रम २१ नियम ५४ अन्वये दिलेल्या अर्जावर माझया पुर्व पिठासीन अधिका-यांनी दिनांक ०८/०२/२०२४ रोजी आदेश करुन सदर मिळकत तबदील करण्यास बंदी घातली. मात्र त्यानंतरही सामनेवाला यांनी रक्कम भरण्यापोटी कोणतीही तजवीज केली नाही.

**२.** प्रस्तुत दरखास्तीमध्ये सामनेवाला आजरोजी गैरहजर आहेत. त्यांचे वकिल विशेष दिवाणी दावा क्र.६४/२०२२ कामी आजरोजी हजर होते. या प्रकरणात त्यांनी कोणतेही भाष्य केले नाही.

**३.** सामनेवाला क्र.१ सुनिता नाईक हिच्या नावे अहमदपूर नगर परिषद हद्दीमध्ये असलेली भुखंड क्र.ए-५१२८/१ ही मिळकत जिच्या चतु:सिमा पुर्वेस-भुखंड क्र.१८-बी, पश्चिमेस-भुखंड क्र.६-बी, दक्षिणेस-२०फुट रोड, उत्तरेस-स्मीता नाईक हिचे घर, ही मिळकत, जी तबदील करण्यास यापुर्वीच मनाई करण्यात आलेली आहे, ती जप्त करण्यात येते. सदर मिळकत विक्री

करण्यासाठी तिच्या विक्रीच्या अटी व शर्ती ठरविण्यासाठी जाबदार क्र.१ सुनिता नाईक हिने न्यायालयात हजर रहावे. सदर मिळकत जप्त करुन तिचा लिलाव करणे असल्याने त्याअनुषंगाने दवंडी देवून, जाहिरनामा काढून तसेच ग्रामपंचायत मुळकी, तहसीलदार कचेरी अहमदपूर, उपविभागीय अधिकारी महसुल अहमदपूर, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अहमदपूर आणि जप्त करावयाच्या मिळकतीवर या ठिकाणी जाहिरनामा सर्वांना दिसेल अशा पध्दतीने प्रसिध्द करावा.

**४.** सदर प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर दि.प्र.सं.क्रम २१ नियम ६४ अन्वये या मिळकतीची विक्री करुन येणा-या रक्कमेतुन दरखास्तदाराची दरखास्तीत नमुद रक्कम भागवून उर्वरीत रक्कम जाबदार क्र.१ यांना द्यावी. तत्पुर्वी जर जाबदार क्र.१ व २ यांनी दरखास्तीत नमुद रक्कम पुर्णपणे फेड केली तर सदर प्रक्रिया राबवू नये.

**स्वाक्षरीत/-**

दिनांक १८/०९/२०२४.

**[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.